सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

दूरध्वनी क्र.(0217)- 2731020
Email ID : prashasan.solapur@gmail.com

**महसूल शाखा- कार्यासन क्र.4**
पत्ता – मुख्य इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय
आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर - 413 001

**जा.क्र.२०२३/मशा/कार्या-४/२अ/प्र.क्र.८/आरआर-१०१३** **दिनांक** : १९/०६/२०२३

## प्रेसनोट

विषय :- प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी, आधार लिंक, लँड सिडिंग करुन घ्यावे.

शेतकरी कुटुंबांना निश्चित उत्पन्न देण्यासाठी केंद्र शासनामार्फत दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु करण्यात आली असून या योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकरी कुटुंबास प्रतिवर्षी रक्कम रुपये ६,०००/- तीन समान हप्त्यामध्ये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा केले जातात.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुरुवातीपासून महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या महसूल विभागाकडून सदरची योजना आता कृषी विभागाकडे हस्तांतरित करण्याचा शासन निर्णय कृषी व पदुम विभागामार्फत दिनांक १५ जून, २०२३ रोजी पारीत करण्यात आला आहे.

सद्यस्थितीमध्ये केंद्र शासनामार्फत १४ वा हप्ता जमा करण्याची कार्यवाही सुरु असून जिल्हयामध्ये अद्यापही सुमारे १ लाख २३ हजार लाभार्थ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करुन घेतली नाही. तसेच ज्या लाभार्थ्यांनी अद्यापही आपले बँक खाते आधार संलग्न करुन घेतले नाही, ज्या लाभार्थ्यांच्या भूमी अभिलेखाची माहिती (Land Seeding) पोर्टलवर अद्ययावत केली नाही अशा लाभार्थ्यांनी **दिनांक २०/०६/२०२३ आणि दिनांक २१/०६/२०२३** रोजी कृषी आणि महसूल विभागामार्फत तालुका स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पमध्ये आपले आधार कार्ड, बँक पासबुक, ७/१२ उतारा आणि इतर आवश्यक कागदपत्रे घेऊन जावे आणि आपली प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया, बँक खाते आधार लिंक करणे आणि भूमी अभिलेखाची माहिती (Land Seeding) पोर्टलवर भरणे ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी. जे लाभार्थी सदरच्या प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत असे लाभार्थी पी एम किसान योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत.

लाभार्थ्यांनी ई-केवायसी आणि आधार लिंकसाठी कृषी विभागाशी तर भूमी अभिलेखाची माहिती (Land Seeding) पोर्टलवर भरणेकामी महसूल विभागाशी संपर्क साधावा.

(शमा पवार)
जिल्हास्तरीय नोडल अधिकारी
(पी एम किसान) तथा
निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर

मा. जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार }

प्रति :- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर
२/- विषयांकित प्रकरणी आकाशवाणी, दूरदर्शनसह सर्व इलेक्ट्रॉनिक मिडिया व प्रिंट मिडिया, स्थानिक वर्तमानपत्रे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत : मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : मा. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.